**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र.२**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १३/६/२०१९ वेळ :- सकाळी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १३/६/२०१९ रोजी सकाळी १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.नामदेव जनार्दन ढाके
६. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७. मा.अपर्णा निलेश डोके
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
९. मा.राजेंद्र तानाजी गावडे
१०. मा.निता विलास पाडाळे
११. मा.बिभीषण चौधरी , नामनिर्देशीत सदस्य
१२. मा.देविदास पाटील , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

श्री.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, श्री.प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, श्री.कुंडलिक दरवडे – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.आर.एम.इंगळे – उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.अहिरे – उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, श्रीमती अमृता लागु – लेखाधिकारी इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष करुणाताई शेखर चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) मागील कार्यपत्रिका क्र. ११, दिनांक ०६/०२/२०१९, कार्यपत्रिका क्र.१२, दिनांक १४/२/२०१९ तसेच कार्यपत्रिका क्रमांक १, दिनांक ९/५/२०१९ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र. १ विषय क्र. १
दि. १३/६/२०१९
सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक: मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ :- मा.राजेंद्र गावडे यांचा दि.२७/५/२०१९ चा प्रस्ताव..

चिंचवडगांव प्रभाग क्रमांक १८ मधील जुना जकात नाका ते पवनानगर रस्त्याला कै.यलाप्पा कु-हाडे मार्ग असे नांव देणेकामीच्या तसेच सदर रस्त्यावर नामफलक लावण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. २ विषय क्र. २
दि. १३/६/२०१९
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे
संदर्भ :- मा.क्षेत्रिय अधिकारी, ब क्षेत्रिय कार्यालय यांचे दि.१२/६/२०१९ चे पत्र

मा.क्षेत्रिय अधिकारी, ब क्षेत्रिय कार्यालय यांचे दिनांक १२/६/२०१९ चे प्रस्तावात नमुद विकास आराखडयातील रस्ते विकसीत करणे आवश्यक आहे. त्या करिता सदरच्या रस्त्यांच्या जागा मनपाच्या ताब्यात घेवुन रस्ते विकसीत करावे लागणार आहेत. सदरची जागा प्रपत्र अ व ब व्दारे आगाऊ ताब्यात येत नसल्याने भुसंपादनाव्दारे ताब्यात घ्यावी लागणार आहे. सबब उपरोक्त नमुद विकास आराखडयातील रस्त्यांच्या जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेबाबतचे विषयास मान्यता देणेस तसेच मौजे रावेत येथील स.नं.८३ पासुन पुर्वेकडे जाणारा २४ मी.डी.पी रस्ता दक्षिणोत्तर २४ मी रस्त्यास क्रॉस करुन पुर्वेकडे स.नं.१४७ पर्यंतचा नाल्यापर्यंत येऊन थांबतो.

सबब मौजे रावेत येथील जुन्या हद्दीत स.नं.१४७ जवळील नाल्यापासुन पुर्वेकडील स.नं १८० व १८१ मधील अस्तित्वातील २४ मी पर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये २४ मी.रुंदीचा रस्ता घोषित करणेकामीचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. करुणाताई शेखर चिचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणाताई शेखर चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ /२०१९.
दिनांक : / ०६ /२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना